नि.फौ.ख.क्र.९८/२०२३
शासन विरुध्द सचिन
नि.क्र.१६

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र १.**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नाव - मंगेश लक्ष्मण पवार,

वय – ३५ वर्षे, कामधंदा - मजूरी ,

राहणार – चिंधवली, ता. वाई.

सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती कदम -

दि. ०९.०१.२०२३ रोजी पोलीसांनी मला कुठेही पंचनामा करण्याकामी बोलाविले नव्हते. त्यादिवशी मी स्वतः गुळुंब येथे माझ्या आत्याला भेटण्याकरीता गेलो होतो. तेथे पोलीसांनी पंचनामा कार्यवाही केली होती आणी मी त्यावर सही केली होती. तो पंचनामा कशाकरीता करण्याकरीता आला याबाबत मला सांगता येणार नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास समर्थन करीत नसल्याने त्यास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दि.०९.०१.२०२३ रोजी पोलीसांनी मला गुळुंब गावच्या हददीत पटटी नावाच्या शिवारात पंचनामा करण्याकामी बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या पंचनामा कार्यवाहीच्या वेळी तेथे मंगल वसंत यादव या हजर होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी त्यांनी मला व पोलीसांनी घटनेचे ठिकाण दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मंगल हयांनी पटटी येथील शिवारात असलेल्या त्यांच्या घरासमारे घटना घडलेले ठिकाण आम्हाला दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी त्यांनी तेथील पिंपळणीच्या मुळीने त्यांना मारहाण झाल्याबाबत आम्हास सांगीतले व ती मुळे माझ्या समक्ष पोलीसांच्या

स्वाधीन केली. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे पोलीसांनी ती मुळी हस्तगत केली होती. सदरील मुळी मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

(*मुददेमाल दाखल नसल्याने पुढील सरतपास तहकूब. संबंधीत पोलीस ठाणे अधिकारी हयांना मुददेमाल पुढील तारखेपर्यंत न चुकता दाखल करण्याबाबत याव्दारे आदेशीत करण्यात येत आहे. तसे न केल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.* )

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरी/-
दि.३०.०४.२०२४
(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वाई.